# राजगुरुनगरमध्ये वैष्णव, सारिकाचा सन्मान



राजगुरुनगर (ता. खेड) : राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धेत यश मिळविल्याबद्दल सारिका शिनगारे, वैष्णव ठाकूर यांचा सन्मान करताना मान्यवर.

राजगुरूनगर, ता. २२ : हुतात्मा राजगुरू महाविद्यालयाचा विद्यार्थी वैष्णव ठाकूर याने ९६ किलो कनिष्ठ वजनी गटामध्ये सुवर्णपदक, तर सारिका शिनगारे हिने ४५ किलो वरिष्ठ वजनी गटात रौप्यपदक पटकविले आहे. पंजाबमधील पतियाळा येथे वेटलिफ्टिंग फेडरेशनच्या वतीने १० ते १२ ऑगस्ट रोजी वरिष्ठ व कनिष्ठ गटाच्या राष्ट्रीय वेटलिफ्टिंग स्पर्धा पार पडली.

या गुणवंत विद्यार्थी खेळाडूंचा सन्मान खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील व उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर यांच्या हस्ते करण्यात राजगुरुनगर येथे आला. याप्रसंगी संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. एन. एम. जरे, उपप्राचार्य संजय शिंदे, प्रा. एस. एन. टाकळकर, प्रबंधक कैलास पाचारणे उपस्थित होते. यशापयशाची चिंता न करता सर्वोत्तम क्षमतेने खेळ करा. क्रीडा संस्कृती जोपासूनविद्यार्थ्यांना उत्तमोत्तम क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संस्था कटिबद्ध असल्याचे यावेळी संस्थाध्यक्ष बुट्टे पाटील यांनी सांगितले.

या यशामुळे सारिका शिनगारे व वैष्णव ठाकूर यांची २५ ऑगस्ट ते ३० सप्टेंबर दरम्यान पतियाळा येथे होणाऱ्या राष्ट्रीय शिबिराकरिता निवड झाली. या शिबिरातून ऑक्टोबरमध्ये सिंगापूर येथे होणाऱ्या वरिष्ठ व कनिष्ठ गटाच्या कॉमनवेल्थ स्पर्धेकरिता भारतीय वेटलिफ्टिंग संघाची निवड होणार आहे. या यशस्वी खेळाडूंना क्रीडाशिक्षक प्रा. प्रतिमा लोणारी, प्रा. तानाजी पिंगळे, प्रा. सारिका गोरे, प्रा. योगेश मोहिते यांनी मार्गदर्शन केले, तर राहुल गायकवाड यांनी सहकार्य केले.